Original

202

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

**Tribal Research and Training Institute**

प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण - भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती

**Training Needs Analysis** – Tribal village-level governance strategies for sustainable development in the Bhimashankar area

२०१०

## पर्यावरण आणि विकास केंद्र, यशदा

**Centre For Environment and Development, YASHADA**

## यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी

**YASHWANTRAO CHAVAN ACADEMY OF DEVELOPMENT ADMINISTRATION**

© (२०१०) श्री वी. रमणि, भा. प्र. से., महासंचालक, यशदा, पुणे
सदरील दस्तऐवज खालील प्रमाणे संबोधित करण्यात यावा -
भुषण, भारत २०१० (संपादक): प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण - भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावपातळीवरील प्रशासकीय पध्दती प्रशिक्षण गरजा विश्लेषण अहवाल, पर्यावरण व विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा).

Bhushan, Bharat 2010 (Editor): Training Needs Analysis (TNA) – Tribal village-level governance strategies for sustainable development in the Bhimashankar area, Centre for Environment and Development (CED), Yashwantrao Chavan Academy of Development Administration (YASHADA).

गावनिहाय विशिष्ट अहवाल संपादन गट (पर्यावरण व विकास केंद्र, यशदा) -

- **स्वाती कामत, संशोधन सहाय्यक** — **Swati Kamat, Research Assistant**
- **अपर्णा कोंढरे, प्रलेखन सहयोगी** — **Aparna Kondhare, Documentation Associate**
- **स्मिता केदारी, सत्र सहाय्यक** — **Smita Kedari, Course Assistant**

**यशदाविषयी...** यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), ही महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था आहे. ही संस्था विकास प्रशासन प्रबोधिनी व राज्य ग्रामीण विकास प्रशिक्षण संस्था अशी दुहेरी भूमिका बजावते.

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. मा. यशवंतराव चव्हाण यांनी लोकाभिमुख प्रशासनाची गरज ओळखून महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्या अनुषंगाने प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने मुंबई येथे १९६३ मध्ये महाराष्ट्र विकास प्रशासन संस्था (मिडा), म्हणून प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय सुरु केले. १९८४ साली ही संस्था पुणे येथील राजभवनाच्या आवारात आली. १९९० पासून ही संस्था यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) म्हणून ओळखली जाते.

प्रशासकीय अधिकाऱ्यांव्यतिरिक्त महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदांमधील अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती यांनाही प्रशिक्षण यशदा करीत आहे. केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील कार्मिक व प्रशिक्षण विभागाने पुरस्कृत केलेले प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित केले जातात. स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनाही ग्रामीण विकासाशी संबंधित विषयावरील प्रशिक्षणाकरीता वेळोवेळी संधी उपलब्ध करुन दिली जाते. विकास प्रशासन संबंधित अध्ययनाचे कामही राबविले जातात.

**संपर्क : यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,** यशदा आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७
फोन नं. : (०२०) २५६०८१५५ / २५६०८००० फॅक्स. : (०२०) २५६०८१००

**श्री. वी. रमणि, भा.प्र.से.**
महासंचालक, यशदा.

**Shri V. Ramani, IAS**
Director General, YASHADA
ramaniv@gmail.com

**डॉ. भारत भुषण**
अधिष्ठाता (विद्याशाखा) व प्राध्यापक,
पर्यावरण नियोजन, पर्यावरण व विकास केंद्र, यशदा.

**Dr. Bharat Bhushan**
Dean (Academic) and Professor, Environmental Planning,
Centre for Environment and Development, YASHADA
bharatbhushan@yahoo.com

---

**आदिवासी गावांमधील ग्राम पातळीवरील प्रशासकीय प्रक्रीयेत सहभागी असणा-या अधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ,** बचत गट, विविध समिती अध्यक्ष व सदस्य यांना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे हे निश्चित करुन प्रशिक्षण गरजा विश्लेषण करण्याचे काम यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस देण्यात आले.

**डॉ. अरविंद कुमार झा, भा.व.से.**
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
आदिवासी विकास विभाग,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११००१

**Dr. Arvind Kumar Jha, IFS**
Commissioner, Tribal Research and Training Institute, Tribal Development Department,
28, Queens Garden, Pune - 411001.

# प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण
# Training Needs Analysis (TNA)

## भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावपातळीवरील प्रशासकीय पध्दती
## **Tribal village-level governance strategies for sustainable development in the Bhimashankar area**

आदिवासी गावांमधील ग्राम पातळीवरील प्रशासकीय प्रक्रियेत सहभागी असणा-या अधिकारी, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, बचत गट, विविध समिती अध्यक्ष व सदस्य यांना कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे हे निश्चित करुन प्रशिक्षण योजना आखण्याचे काम यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस देण्यात आले.

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती बाबत प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करण्याच्या हेतूने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा) पुणे व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे दरम्यान करार करण्यात आला.

या कार्यक्रमाअंतर्गत पर्यावरण आणि विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) मार्फत भिमाशंकर आदिवासी क्षेत्रातील गावामध्ये शाश्वत विकासाच्या दृष्टीने गाव पातळीवरील प्रशासकीय पद्धतीचा अभ्यास करण्याकरिता प्रस्ताव देण्यात आला. सदर प्रस्ताव माननीय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून मान्य करण्यात आला. प्रकल्प प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या प्रकल्पनिधीस देखील मान्यता देण्यात आली व सदर निधी यशदाकडे धनादेशाद्वारे सुपूर्त करण्यात आला. सदर प्रकल्पांतर्गत अंमलबजावणी करण्याकरिता पर्यावरण आणि विकास केंद्र, यशदा मधील अधिकारी व कर्मचारी तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मधील अधिकारी व कर्मचारी यांच्या दरम्यान यशदा व आदिवादी संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे बैठका आयोजित करण्यात आल्या. माननीय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली विशिष्ठ पाच गावे निश्चित करण्यात आली. या गावांव्यतिरिक्त एक गाव नमुना म्हणून निवडण्यात आले. या गावातील माहितीच्या आधारे इतर गावांमधून माहिती गोळा करण्याकरिता प्रश्नावली तयार करण्यात आली. सदर प्रश्नावली माननीय आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून मंजूर करुन घेण्यात आली.

भिमाशंकर येथील आदिवासी भागामधील निवडक पाच गावांमध्ये प्रशासकीय पद्धतीचा अभ्यास करण्याकरिता प्रत्येक गावामध्ये भेटी आयोजित करण्यात आल्या. प्रत्येक गावास एक दिवस या प्रमाणे भेटींचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेदरम्यान भिमाशंकर येथील गावांकरिता उपस्थित असलेले यशदातील व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून पुढील प्रमाणे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते - डॉ. भारत भुषण, श्री विजय डगळे, श्रीमती स्वाती कामत, श्रीमती अपर्णा कोंढरे, श्री सुधीर सुपेकर, श्री डी. एस. तुरुके. तसेच सदर अहवाल तयार करण्याकरिता श्रीमती स्मीता केदारी, श्रीमती श्रद्धा कुलकर्णी व श्रीमती कविता बोंबले यांनी सहकार्य केले आहे.

सदर अहवालामध्ये भिमाशंकर येथील निवडक पाच गावांमधील सर्वेक्षणानुसार व ग्रामस्थांबरोबर घेण्यात आलेल्या चर्चेमधून प्रत्यक्ष रित्या संकलित केली गेलेली माहिती मांडण्यात आली आहे.

# भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावपातळीवरील प्रशासकीय पध्दती

## Tribal village-level governance strategies for sustainable development in the Bhimashankar area

सदर प्रकल्प प्रस्ताव आराखडा पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागांमध्ये अभ्यास करण्यासाठी होता. 'भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती' हा प्रस्तावित अभ्यास पर्यावरण व विकास केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, यांच्या वतीने आयोजित करण्यात आला.

**उद्दिष्टये :-**

१. भिमाशंकर क्षेत्रातील आदिवासी गावातील ग्रामसभा व पंचायत बैठकांमधील शाश्वत विकासाच्या सद्यस्थितीच्या प्राधान्याचे प्रलेखन करणे.
२. आदिवासी गावांतील पंचायतीच्या बैठकीच्या प्रक्रियेत प्रशासकिय पध्दतीच्या शाश्वत विकासाची क्षमता बांधणीवर प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करणे
३. आदिवासी गावातील पंचायत बैठकीच्या पर्यावरणीय प्रशासनासाठी, सूक्ष्म अर्थिकता, पुढाकार यांची प्रकल्प प्राधान्यता ओळखणे.

**पध्दती :-**

१. भिमाशंकर क्षेत्राच्या जवळपासच्या पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील ५ आदिवासी गावे शोधणे.
२. (अ) आदिवासी भागातील ग्रामसभा व पंचायत बैठकीच्या शाश्वत विकासाच्या प्राधान्यतेच्या सद्यस्थिती विषयी प्रलेखन करणे व (ब) प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करणे. यासाठी एका गावात एक कार्यशाळा असे एक दिवसीय ५ कार्यशाळा आयोजित करणे
3. क्षेत्र भेटीच्या वेळी सर्वेक्षण व चर्चा करुन प्रस्ताव तयार करणे याद्वारे पर्यावरण प्रशासन, सूक्ष्म आर्थिकता आणि पुढाकार यांचा अंतर्भाव ग्रामसभा व पंचायत बैठकीच्या विषयसूचित समाविष्ट करणे.

सदर अहवालामध्ये भिमाशंकर क्षेत्रातील खालील पाच गावांचा समावेश होता -

| अनुक्रमांक | गावाचे नाव | गाव भेटीचा दिनांक | अहवाल पृष्ठ क्र |
|---|---|---|---|
| १. | असाणे | १७ मार्च २०१० | ६ ते ८ |
| २. | बोरघर | ८ एप्रिल २०१० | ८ ते ११ |
| ३. | जांभोरी | २३ एप्रिल २०१० | १२ ते १५ |
| ४. | कोंढवळ | १९ मे २०१० | १६ ते १७ |
| ५. | राजपूर | १९ मे २०१० | १८ ते २० |

# भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावपातळीवरील प्रशासकीय पध्दती प्रशिक्षण गरजा विश्लेषण

| Code<br>संकेत | Focus areas for capacity building<br>क्षमता बांधणीची दृष्टिक्षेपातील क्षेत्रे |
|---|---|
| | |
| | |
| **A**<br>अ | **Capacity Building of Gramsevak**<br>ग्रामसेवकांची क्षमता बांधणी |
| **A.1**<br>अ.१ | Mumbai Grampanchayat Act<br>मुंबई ग्राम पंचायत अधिनियम |
| **A.2**<br>अ.२ | Information and Knowledge of various schemes of the Government that can be implemented in the region<br>संबंधित क्षेत्रामध्ये राबविता येतील अशा शासन योजनांची माहिती व ज्ञान |
| **A.3**<br>अ.३ | Communication Skills<br>संवाद कौशल्य |
| **A.4**<br>अ.४ | Maintenance aspects for project sustainability<br>प्रकल्पाच्या शाश्वततेसाठी देखभाल |
| **A.5**<br>अ.५ | Moral Responsibility<br>नैतिक जबाबदारी |
| **A.6**<br>अ.६ | Services to the tribes<br>ग्रामीण क्षेत्रातील गरीब आदिवासींसाठी सेवा |
| **A.7**<br>अ.७ | Maintenance of record of the Grampanchayat and Gramsabha<br>ग्राम पंचायत व ग्राम सभेचे अभिलेख जतन करणे |
| **A.8**<br>अ.८ | Preparation of Project Proposal, Budgets and their implementation<br>प्रकल्प प्रस्ताव, अंदाजपत्रक तयार करणे व अंमलबजावणी करणे |
| **A.9**<br>अ.९ | Disaster Management<br>आपतकालीन व्यवस्थापन |
| **A.10**<br>अ.१० | Right to Information Act<br>माहितीचा अधिकार कायदा |
| **A.11**<br>अ.११ | Computer knowledge and training<br>संगणक ज्ञान व प्रशिक्षण |
| **A.12**<br>अ.१२ | Reforms for taxes and user charges<br>कर व करदात्याविषयक सुधारणा |
| **A.13**<br>अ.१३ | Rural environmental management<br>ग्रामीण पर्यावरण व्यवस्थापन |
| **A.14**<br>अ.१४ | Administrative reforms<br>प्रशासकीय सुधारणा |
| **A.15**<br>अ.१५ | Public private partnership<br>सार्वजनिक खाजगी भागीदारी |

| Code<br>संकेत | **Focus areas for capacity building**<br>क्षमता बांधणीची दृष्टिक्षेपातील क्षेत्रे |
|---|---|
| A.16<br>अ.१६ | Monitoring implementation of development reforms<br>विकासात्मक सुधारणा अंमलबजावणीचे सनियंत्रण |
| A.17<br>अ.१७ | Stress Management<br>ताण तणाव व्यवस्थापन |
| | |
| **B**<br>ब | **Capacity Building of Sarpanch**<br>सरपंचांची क्षमता बांधणी |
| **B.1**<br>ब.१ | Understanding rural/ village level reforms<br>ग्रामीण सुधारणाबाबत जाणीव |
| **B.2**<br>ब.२ | Accounting, budget and financial reforms<br>लेखा, अर्थसंकल्प व वित्तिय सुधारणा |
| **B.3**<br>ब.३ | Reforms for e-governance<br>ई-प्रशासनाकरीता सुधारणा |
| **B.4**<br>ब.४ | Reforms for basic services to Tribals<br>आदिवासी क्षेत्रातील गरीबांसाठी मुलभूत सेवा संबंधी सुधारणा |
| **B.5**<br>ब.५ | Legal and procedural frameworks<br>कायदेशीर व प्रक्रियात्मक कार्यप्रणाली |
| **B.6**<br>ब.६ | Village level environmental management<br>गाव पातळीवरील पर्यावरण व्यवस्थापन |
| **B.7**<br>ब.७ | Administrative reforms<br>प्रशासकीय सुधारणा |
| **B.8**<br>ब.८ | Public private partnership<br>सार्वजनिक खाजगी भागीदारी |
| **B.9**<br>ब.९ | Monitoring implementation of developmental reforms<br>विकासात्मक सुधारणा अंमलबजावणीचे सनियंत्रण |
| **B.10**<br>ब.१० | Communication Skills<br>संवाद कौशल्य |
| **B.11**<br>ब.११ | Moral Responsibility<br>नैतिक जबाबदारी |
| **B.12**<br>ब.१२ | Stress Management<br>ताण तणाव व्यवस्थापन |
| **B.13**<br>ब.१३ | Administrative reforms and citizen's charter<br>प्रशासकीय सुधारणा व नागरीकांची सनद |
| **B.14**<br>ब.१४ | Community participation, transparency and accountability for ward-level committees<br>वॉर्ड स्तरावरील समित्यांसाठी लोकसहभाग, पारदर्शकता व उत्तरदायित्व |
| **B.15**<br>ब.१५ | Inter-departmental coordination for locality management<br>वस्ती व्यवस्थापनासाठी आंतरविभागीय समन्वय |
| **B.16**<br>ब.१६ | Micro-finance and poverty<br>सूक्ष्म आर्थिक व्यवस्था व दारिद्रय |
| **B.17**<br>ब.१७ | Legal and procedural aspects<br>कायदेशीर व प्रक्रियात्मक बाबी |
| | |

| Code<br>संकेत | Focus areas for capacity building<br>क्षमता बांधणीची दृष्टिक्षेपातील क्षेत्रे |
|---|---|
| | |
| C<br>क | **Capacity Building of President and members of various village level committees**<br>गाव पातळीवरील विविध समित्यांवरील समिती अध्यक्ष्य व सदस्य यांची क्षमता बांधणी |
| C.1<br>क.१ | Understanding working of the various village level committees<br>विविध समित्यांच्या कामकाजाबाबत माहिती व ज्ञान |
| C.2<br>क.२ | Understanding rural/ village level reforms<br>ग्रामीण सुधारणाबाबत जाणीव |
| C.3<br>क.३ | Accounting, budget and financial reforms<br>लेखा, अर्थसंकल्प व वित्तिय सुधारणा |
| C.4<br>क.४ | Reforms for e-governance<br>ई-प्रशासनाकरीता सुधारणा |
| C.5<br>क.५ | Legal and procedural frameworks<br>कायदेशीर व प्रक्रियात्मक कार्यप्रणाली |
| C.6<br>क.६ | Village level environmental management<br>गाव पातळीवरील पर्यावरण व्यवस्थापन |
| C.7<br>क.७ | Administrative reforms<br>प्रशासकीय सुधारणा |
| C.8<br>क.८ | Communication Skills<br>संवाद कौशल्य |
| C.9<br>क.९ | Moral Responsibility<br>नैतिक जबाबदारी |
| C.10<br>क.१० | Stress Management<br>ताण तणाव व्यवस्थापन |
| C.11<br>क.११ | Capacity Building of Forest Resource Management Committee under Section 3(1) Forest Right Act<br>वन संसाधन व्यवस्थापन कमिटीच्या सदस्यांकरिता वन हक्क कायदा कलम ३(१) अंतर्गत क्षमता बांधणी |
| C.12<br>क.१२ | Management of Forest Rights on Sustainable Resources<br>शास्वत संसाधने वर आधारित वन हक्कांचे व्यवस्थापन |
| C.13<br>क.१३ | Community Participation in Forest and Wild Life Resources<br>वन व वन्यजीव संसाधनांकरिता लोकसहभाग |
| C.14<br>क.१४ | Community participation, transparency and accountability for village-level committees<br>ग्राम स्तरावरील समित्यांसाठी लोकसहभाग, पारदर्शकता व उत्तरदायित्व |
| | |
| D<br>ड | **Capacity Building of Coordinators of SHGs and members of SHGs**<br>गाव पातळीवरील बचत गट अध्यक्ष व सदस्य यांची क्षमता बांधणी |
| D.1<br>ड.१ | Understanding working of an SHG<br>बचत गटांच्या कामकाजाबाबत माहिती व ज्ञान |
| D.2<br>ड.२ | Understanding rural/ village level reforms and government schemes<br>ग्रामीण सुधारणा शासकीय योजनांबाबत जाणीव |

| Code<br>संकेत | **Focus areas for capacity building**<br>क्षमता बांधणीची दृष्टिक्षेपातील क्षेत्रे |
|---|---|
| **D.3**<br>ड.३ | Accounting, budget and financial reforms<br>लेखा, अर्थसंकल्प व वित्तिय सुधारणा |
| **D.4**<br>ड.४ | Legal and procedural frameworks<br>कायदेशीर व प्रक्रियात्मक कार्यप्रणाली |
| **D.5**<br>ड.५ | Village level environmental management<br>गाव पातळीवरील पर्यावरण व्यवस्थापन |
| **D.6**<br>ड.६ | Communication Skills<br>संवाद कौशल्य |
| **D.7**<br>ड.७ | Stress Management<br>ताण तणाव व्यवस्थापन |
| **D.8**<br>ड.८ | Community participation, transparency and accountability<br>लोकसहभाग, पारदर्शकता व उत्तरदायित्व |
| | |
| **E**<br>ई | **Capacity Building of Villagers**<br>ग्रामस्थांची क्षमता बांधणी |
| **E.1**<br>ई.१ | Understanding working of Gram sabha<br>ग्राम सभेच्या कामकाजाबाबत माहिती व ज्ञान |
| **E.2**<br>ई.२ | Knowledge of rural/ village level reforms and government schemes<br>ग्रामीण सुधारणा व शासकीय योजनांबाबत माहिती |
| **E.3**<br>ई.३ | Understanding Accounting, budget and financial implications under various government schemes<br>विविध शासकीय योजनांतर्गत लेखा, अर्थसंकल्प व वित्तिय उलाढालींबाबत माहिती |
| **E.4**<br>ई.४ | Legal and procedural frameworks<br>कायदेशीर व प्रक्रियात्मक कार्यप्रणाली |
| **E.5**<br>ई.५ | Village level environmental management<br>गाव पातळीवरील पर्यावरण व्यवस्थापन |
| **E.6**<br>ड.६ | Communication Skills and Stress Management<br>संवाद कौशल्य व ताण तणाव व्यवस्थापन |
| **E.7**<br>ई.८ | Understanding the role and responsibilities of the Gramsevak and the elected representatives<br>ग्रामसेवक व लोकप्रतिनिधी यांच्या कार्य व जबाबदारी याबाबत माहिती |

## भौगोलिक व आर्थिक स्थिती:-

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व पर्यावरण विकास केंद्र यशदा यांच्या सहयोगाने भिमाशंकर क्षेत्रातील, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी गावांसाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण या विषयांर्गत असाणे गावाला दिनांक १७ मार्च २०१० रोजी भेट देण्यात आली.

सुमारे २००० लोकसंख्या असलेले हे छोटेसे व दुमदार गाव. खरे तर पर्यटन स्थळ म्हणून नावारुपाला येण्याजोगे. उंच उंच डोंगर, हिरव्यागार औषधी वनश्रीने नटलेले व निसर्ग सौंदर्य लाभलेले हे गाव आहे असे वाटते. पावसाळयात न थांबणारा संततधार पाऊस पडणारा हा भाग असूनसुध्दा उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासते कारण पाणी आडवा पाणी जिरवा या संदर्भात शासनाचे अनुदान मंजुर होऊन सुध्दा कित्येक वर्ष ,रखडलेले प्रकल्प येथे आहेत. झपाटयाने विकासाची कामे करणारा कोणी वालीच या गावांना भेटत नाही. काही ठिकाणी राजकारण तर काही ठिकाणी सामाजिकवादाच्या विळख्यात अडकलेली व म्हणूनच विकासापासून वंचित राहिलेली ही गावे आहेत.

असाणे गावातील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार मा. श्री वळसेपाटील यांनी (विकास कामांसाठी) गावाला १२ कोटी रुपये दिले आहेत. त्यातूनच ७ कोटीचा बंधारा बांधण्याचे काम चालू आहे. हळू हळू व संथपणे चालणा-या या विकासाला गती येणार तरी कधी? शासनामार्फत आदिवासींसाठी भरपूर योजना आहेत.


## खाण्यापिण्याच्या पध्दती :-

सकाळच्या न्याहरीला पोहे, रवा म्हणजेच उपीट किंवा गोड शिरा तसेच भाजीमध्ये जास्तकरुन कडधान्य व नाचणी किंवा बाजरी तसेच तांदुळाची भाकरी व भात असेच असते किंवा सकाळची न्याहरी म्हणजे जेवणच असते. दुभती जनावरे पाण्याअभावी नसल्यामुळे चहालासुध्दा दुध मिळत नाही. तिथे लहानबाळाला दुधाविनाच राहावे लागते. पाणी नसल्यामुळे कोथिंबीर नाही, हिरव्या भाज्या नाहीत पौष्टिक आहार नाही अशा ठिकाणी बालके कुपोषित आहेत. आठवडयाचा बाजार आडवरी गावात भरतो ते गाव बरेच लांब आहे. त्यामुळे शक्य झाले नाही तर असेल तेच शिजवून खावे लागते. पाण्या आभावी व मोकाट सोडलेल्या जनावरांमुळे स्थानिक पिक घेता येत नाही. गुरांसाठी वाळलेला चारा साठवून ठेवावा लागतो. (पाण्याची सोय झाल्यावर सदर प्रश्न मिटून गावाचा विकास झपाटयाने होईल.)

## शैक्षणिक सुविधा:-

आंगणवाडीत १५ मुले आहेत त्यापैकी १३ मुले येतात. त्यातील एक शितल हनुमंत साबळे या नावाचे कुपोषित बालक ग्रेड तीन मध्ये मोडते. १ आजारी असल्यामुळे गैरहजर असते. या मुलांना तीन वेळा दवाखान्यात नेले तरी सुधारणा नाही. दवाखाना डिंभे या गावी आहे

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
असाणे, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक १७/०३/२०१०






उपचारासाठी लांब जावे लागते, त्यामुळे रोजगार बुडतो. आजारी मुलगी पाच वर्षाची असून तिसरे आपत्य आहे.

अशा वेळेस शासनातर्फे एका व्यक्तीला बुडित मजुरी मिळते. (बाळ पोटात असल्यापासूनच आईला सकस आहार मिळाला तर ही वेळ येणार नाही.) सध्या आंगणवाडीतील मुलांना पौष्टिक आहार म्हणून हरभरा, मुग, मटकी, वाटाणा अश्या उसळी देण्यात येतात तसेच लाप्शी, मुगाची खिचडी किंवा वरण-भात मिळत आहे. इ. १० पर्यन्त आश्रमशाळा आहे. वसतीगृहाची सोय आहे. **शाळेतील मुली हुशार व चुणचुणीत आहेत. या मुलींना मार्गदर्शन करते वेळी डॉ भारत भुषण अधिष्ठाता (विद्याशाखा) तथा विभागप्रमुख पर्यावरण व विकास केंद्र यांनी इयत्ता पाचवीतील विद्यार्थीनींना पंचायत समिती बैठक मे महिन्यात आयोजित करण्यास सांगीतले त्यासाठी १०-१५ ग्रामस्थांच्या थेट भेटी घेऊन बैठक ठरवावी, महत्वाचे विषय त्यात मांडावेत, प्रस्ताव तयार करावा व बैठक संपल्यावर त्याचा कार्यवृतांत या विद्यार्थिनीनीच तयार करावा. यामध्ये ग्रामसेवक व सरपंच यांनी या विद्यार्थीनींना संपूर्ण मार्गदर्शन करावे असे ठरले. सदर बाब ऐकल्यावर या विद्यार्थिनीना खूपच आनंद झाला असे त्यांच्यात चाललेल्या कुजबुजीवरुन व चेह-यावरुन स्पष्ट दिसत होते. त्या लगेच हो म्हणाल्या व तयार झाल्या. (सरांनी दिलेली ही संकल्पना महिला सबलिकरणाच्या दृष्टिने एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. कारण या गावात मुख्य व्यवसाय शेती हा असून चूल, मुल व शेतीतली कामे या व्यतिरिक्त ब-याच महिलांना ग्रामसभा म्हणजे काय व ग्रामपंचायतीची कामे काय आहेत गावात कुठ-कुठल्या योजना राबविल्या जात आहेत या विषयी काहीच माहिती नाही असे आढळून आले आहे ) ग्रामसेवक व सरपंचांनी सदर विद्यार्थिनींच्या बैठकीबाबत सविस्तर माहिती सरांना दिली तर जिल्हा परिषद, पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना घेऊन सर गावात येणार आहेत असे ठरले. डॉ भारत भुषण यांनी प्रत्यक्ष वर्गात जाऊन पाहणी केली असता असे दिसून आले की, वर्गात शिक्षक नसतानासुध्दा विद्यार्थी ग्रुप करुन प्रश्नपत्रिका सोडविताना दिसत होत्या म्हणजेच या मुलांच्यात खुप काही करण्याची उमेद व सक्षमता आहे परंतु त्यांना योग्य मार्गदर्शन कमी पडत आहे. (इयता १० वीच्या पुढिल वर्ग गावात असावेत कारण इयता १० वी नंतर शिक्षणाची सोय नसल्यामुळे बरेच विद्यार्थी शिक्षण बंद करतात )**

गावात बरेच महिला बचत गट असून अजून कुठलाही व्यवसाय बचतगटांमार्फत चालवला जात नाही. (महिला बचत गटांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.) शासनाच्या विविध कायदयांची त्यांना माहिती नाही.

**वनक्षेत्र व गावः-** औषधी वनस्पती मध्ये आंबा, चिंच, शेवगा, पपई, आवळा, हिरडा, निलगिरी, उंबर वगैरे वनस्पती उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा वापर कश्यासाठी करायचा याची माहिती नाही. जळणासाठी रानातील वाळलेली लाकडे वापरतात, शेणापासून तयार केलेल्या गोव-या वापरतात. ठराविकच घरात गॅस आहेत. दारिद्रय रेषेखालील लोकांना आदिवासी विकास योजनेतून घरगुती गॅस मिळाले आहेत. गॅस भरुन आणण्यासाठी घोडेगाव येथे जावे लागते.

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
असाणे, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक १७/०३/२०१०





**रोजगार साधन :-** गावातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा असून शेती ही निर्सगावर अवलंबून असल्यामुळे पावसाळयातच शेतीची कामे असतात त्यानंतर बरेच लोक रोजगार मिळवण्यासाठी शहराकडे धाव घेतात. पावसाळयात दुस-यांच्या शेतात काम केल्यावर मजुरी मिळते, त्यासाठी शेजारील गावात जावून मजुरी मिळवावी लागते.

**आरोग्य सुविधा :-** गावात एक नर्स येते. आडवारी गावात आरोग्य केंद्र आहे. बाळंतपणासाठी घोडेगावातील नर्सिंगहोम मध्ये जावे लागते. जास्त करून बाळंतपण घरीच नर्सच्या सहाय्याने केले जाते. जनावरांचा डॉक्टर आठ दिवसांनी एकदा येतात. नाही आले तर त्यांना घोडेगावाहून आणावे लागते.

**गावातील प्रशासन :-** ग्रामसेवक व सदस्यांमार्फत ग्रामसभा घेतली जाते. पंचायत समिती आहे. सरपंच, ग्रामसेवक व सदस्य मिळून पंचायत समितीची कामे पाहतात. विविध शासनाच्या योजना राबवण्यासंदर्भात चर्चा होते. आदिवासी लोकांसाठी ठक्करबप्पा या योजनेअंतर्गत ब-याच लोकांना लाभ झालेला आहे. परंतु काही ग्रामस्थांच्या मते त्यांची दारिद्रय रेषेखाली येऊन सुध्दा नावे यादीत नाहीत मागचीच यादी पुढे चालू राहते (या योजना राबविण्यात जर काही कमतरता असेल तर त्याचा लाभ प्रत्येकाला मिळणार नाही त्यासाठी कायदा व नियम यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.) कित्येक महिला, ग्रामस्थ ग्रामसभेच्या बैठकीला उपस्थित राहू शकत नाही कारण बैठक लांब कुठेतरी असते तर काही वेळेस त्यांच्यापर्यन्त बैठकीचा संदेश पोहोचतच नाही, कारण मोबाईल किंवा दूरध्वनीची त्याभागात सोय नाही. एकटया शिपायाला लांबलांब निरोप पोहचवणे काही वेळेस जमतच नाही. ग्रामपंचायतीच्या सभेत व ग्रामसभेत काय चालले आहे याबाबत त्या अज्ञानी राहतात. लोकांना ग्रामसभेचे महत्वच कळालेले नाही त्यामुळे ते सभेस उपस्थित राहत नाही. (ग्रामसभा याबाबत लोकांच्यात जाणीव जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.) दारिद्रय रेषेखाली येण्यासाठी शासनाच्या ज्या अटी आहेत त्या किचकट आहेत त्यामुळे गरिब असून सुध्दा दारिद्रय रेषेखाली येत नाही. योजनांचा लाभ घेता येत नाही.

प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेले गट खालील प्रमाणे
वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी
पर्यटन मार्गदर्शक
सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी
स्वयंसहाय्यता गटाचे सभासद
गावातील युवागट/मंडळे औषधी वनस्पतींचा विविध वापर

## भौगोलिक व आर्थिक स्थितीः-

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व पर्यावरण विकास केंद्र यशदा यांच्या सहयोगाने भिमाशंकर क्षेत्रातील, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी गावांसाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण या विषयांर्गत बोरघर गावाला दिनांक ०८ एप्रिल २०१० रोजी भेट देण्यात आली.

सुमारे २२७१ लोकसंख्या असलेले व ५२१ कुटुंब संख्या, १२ वाडया असून हे गाव चारही बाजूने उंच उंच डोंगर, हिरव्यागार औषधी वनश्रीने नटलेले व निसर्ग सौदर्य लाभलेले गाव आहे. काही ठिकाणी दगडमातीनी बांधलेली घरे तर काही ठिकाणी सिमेंटमध्ये बांधलेली घरे आहेत. पावसाळयात न थांबणारा संततधार पाऊस तर उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचे हाल. अश्या पध्दतीने संपूर्ण निसर्गावर आधारित असा हा रंगीबेरंगी गाव आहे. उतरत्या छप्पराची व कौलारु घरे आहेत. आत्ता आलिकडे पाणीपुरवठा योजना अंतर्गत काम चालू आहे. विहिरीवर मोटर बसवून घराघरामधून पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. अश्या प्रकारे प्रशासकीय नियोजन राबविण्यात येत आहे त्यामुळे पूर्वी इतकी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही, कारण गावात श्रमदान व शासनांच्या योजनांमधून विहिरी गावात बांधण्यात आलेल्या आहेत त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय झालेली आहे. शेतीच्या बाबतीत पाण्याचा तसा प्रश्नच आहे.


गावाच्या खालच्या बाजूला डिंबे धरण आहे त्याच्याभोवती घनदाट झाडी आहेत, उंच उंच डोंगर आहेत. तरी विकासापासून वंचित राहिलेले हे गाव आहे. जमिन खडकाळ आहे. भात, नाचणी, वरई, खुरशी, काळेतीळ, भुईमुग ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. जंगलात डोंगरची मैना म्हणजेच करवंदाच्या भरपूर जाळया आहेत तसेच तुळस, मोरावळा, साधा आवळा, राजगिरा, सब्जा, जांभुळ, आंबा, अशीही उत्पादन देणारी झाडे आहेत.


गावात ३६ महिला बचतगट आहेत. या बचतगटांमार्फत फक्त बचत गोळा करणे व कर्ज घेणे अशा वैयक्तिक कारणांचाच अंर्तभाव होतो. यातून सामुदायीक रोजगार निर्मिती होण्यासाठी प्रशासनाने त्यांना प्रशिक्षित करणे अत्यंत गरजेचे आहे.

वाहतुक व्यवस्था अतिशय विस्कळीत आहे. एसटी पकडण्यासाठी ५-६ कि.मी. अंतर चालत जावे लागते. कारण गावात एसटी येत नाही. (गावात आतपर्यन्त एसटीची व्यवस्था असावी तसेच गावाला पक्कया रस्त्यांची सोय होणे आवश्यक आहे. )

गावात स्वतंत्र अशी बाजारपेठ नाही. शेजारील गावात आठवडयाचा बाजार भरतो. तेथे जाऊन बाजार आणावा लागतो (स्थनिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी )

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
बोरघरगाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक ०८/०४/२०१०






**शेती उत्पादन व जोडधंदे :-**
गावात परसबागसुध्दा लावण्याची सोय नाही कारण वानर व रानडुक्कर हे प्राणी पिकांची नासाडी करतात. त्यामुळे सर्व विकत आणावे लागते. वानर व रानडुक्कर या प्राण्यांचा धुडगुस इतका माजला आहे की, दारात लावलेला पावटा एका रात्रीत सर्वांच्या समक्ष धिटाईने खावून टाकतात. शेतातील पिक वाचवण्यासाठी रात्रीच्या वेळेला शेतात उंच मांडव घालून त्यावर एक-दोन माणसे सतत राखण करून रात्रभर डब्बे वाजवून आवाज देत राहतात. मगच ही जनावरे पळून जातात. हे प्राणी भिमाशंकर अभयारण्यातून येतात व पिकांचे खूप नुकसान करतात. (लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, शासनाने याकडे जातीने लक्ष घालून या जनावरांपासून पिकांचे रक्षण केले पाहिजे अशी गावक-यांची महत्वाची गरज आहे कारण यात शेतक-याचे शारिरीक, मानसिक व अर्थिक नुकसान होत आहे ) वर्षाकाठी आठ महिने शेतीतील जुजबी कामे चालु असतात ४ महिने लोक बेकार बसलेले असतात किंवा रोजगाराच्या शोधात गावाबाहेर प्रयत्न करतात. काही ठराविक लोक दुग्ध व्यवसाय करतात. कोंबडया पाळणे, शेळी-मेंढी पालन, गाय-म्हशी पालन असे जोडधंदे पण काही ठराविक लोकच करतात.


**शैक्षणिक सुविधा:-** गावात इ.१ ली ते ४ थी पर्यन्त प्राथमिक शाळा ठराविक वाडयांना आहे. पुढे ५ ते १० पर्यन्त हायस्कूल आहे. त्या पुढिल शिक्षणासाठी घोडेगाव २० किमी अंतरावर १२ वी पर्यन्त शाळा आहे. त्यामुळे जवळजवळ ७० टक्के मुले पुढील शिक्षणासाठी शहरात गेली आहेत व याचा परिणाम म्हणजे मुलांना शेती व्यवसाय सोडून शहरातील वातावरणाची चटक लागली आहे. गावे ओस पडू लागली आहेत. (ही गंभीर बाब असून गावात पुढील शिक्षणाची सोय होण्यासाठी सर्वप्रथम प्रयत्न व्हायला पाहिजेत.)

**आरोग्य सुविधा :-** गावात दवाखाना उपकेंद्र आहे त्यातील कर्मचारी वाडीवस्तीवर जातात. एक नर्स येते. बाळंतपणासाठी घोडेगावातील नर्सिंगहोम मध्ये जावे लागते. जास्त करुन बाळंतपण घरीच नर्सच्या सहाय्याने केले जाते. जनावरांचा डॉक्टर आठ दिवसांनी एकदा येतात. नाही आले तर त्यांना घोडेगावाहून आणावे लागते. थंडीताप, मलेरिया, कावीळ असे आजार जास्त करुन होतात. विषारी साप चावून मरणा-यांचें प्रमाण जास्त आहे कारण साप चावल्यावर दवाखाना उपलब्ध होण्यास उशीर होता कारण एकतर वाहन व्यवस्था ठिक नाही, रस्ते व्यवस्थित नाहीत, एसटी स्टॅण्ड लांब कोसावर आहे शिवाय तेथे जाऊन एसटी येण्याची वाट पाहावी लागते यासर्व गोष्टी करण्यात बराच वेळ जातो आणि त्यामुळे पेशन्ट दगावतो. (सर्प दंशावर ताबडतोब उपाय व्हावा अश्या प्रकारची उपचार पध्दतीची सुविधा तात्काळ गावात उपलब्ध व्हावी )

**सांस्कृतिक कार्यक्रम :-चैत्र वैद्य अष्टमीला भैरवनाथाचा व मुक्तादेवीचा उरुस असतो** गावात तीन भजनी मंडळे आहेत. कोणताही सण असला तरी गावात भजन किर्तन सप्ताह असे सांस्कृतिक कार्यक्रम होतात. नागपंचमी ते शिमगा सर्व सण साजरे होतात. एक गाव एक गणपती प्रथा आहे. भाद्रपद आमावस्येला बैलपोळा, विजय दशमी नवरात्रीत शंभो महादेवाचा घट बसवतात, तसेच कळंमजाई, वरसुआई, मुक्तादेवी या देवींचा घट बसवतात दसरा, दिवाळी, गुढीपाडवा असे सण साजरे करतात प्रत्येक सणाला नैसर्गिक वस्तूंचा वापर जास्तीत

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
बोरघरगाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक ०८/०४/२०१०





जास्त केला जातो. गोडाचाच नैवेद्य देवाला केला जातो. पांगारा, उंबर व वरस ही झाडे देवाची आहेत असे मानुन गावातील लोक या झाडांची लाकडे जळणासाठी वापरत नाहीत.

**प्रशासकीय पध्दत :-**

ग्रामसभा:- ज्या दिवशी ग्रामसभा घ्यावयाची असते त्याच्या आधी आठवडा भर त्याची बातमी सर्व सभासदांपर्यंत पोहचवण्यासाठी गावात दवंडी दिली जाते. गावे वाडया वस्त्या लांब लांब आहेत त्यामुळे प्रत्येक वस्तीमधून एक किंवा दोन सभासद ग्रामसभेला उपस्थित असतात. वरसावणे व बोरघर गावात दोन महसूल गावे आहेत. मे महिन्यात घेतल्या जाणा-या सभेला दारिद्रय रेषेखाली लोकांची संख्या जास्त असते कारण त्यावेळी लाभार्थी निवडले जातात.

प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेले गट खालील प्रमाणे

- वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी
- पर्यटन मार्गदर्शक
- सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी
- स्वयंसहाय्यता गटाचे सभासद
- गावातील युवागट/मंडळे औषधी वनस्पतींचा विविध वापर

**भौगोलिक व आर्थिक स्थिती:-**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व पर्यावरण विकास केंद्र यशदा यांच्या सहयोगाने भिमाशंकर क्षेत्रातील, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी गावांसाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण या विषयांर्गत जांभोरी गावाला दिनांक २३ एप्रिल २०१० रोजी भेट देण्यात आली.

८ ते १० कि.मी. अंतरावर पसरलेला जांभोरी गावाचा परिसर आहे. प्रत्यक्ष मतदान १८०० इतके होते. सुमारे ३०००-३५०० लोकसंख्या असलेले व ५६९ कुटुंब संख्या, १२ वाडया-वस्त्या महादेव कोळी व नवबौध्द समाजाचे आदिवासी लोक असून चारही बाजूने उंच उंच डोंगर, हिरव्यागार औषधी वनश्रीने नटलेले व निसर्ग सौंदर्य लाभलेले हे गाव आहे. काही ठिकाणी दगडमातीनी बांधलेली घरे तर काही ठिकाणी सिमेंटमध्ये बांधलेली घरे आहेत. पावसाळयात न थांबणारा संततधार पाऊस तर उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचे हाल. अश्या पध्दतीने संपूर्ण निसर्गावर आधारित असा हा गाव आहे. उतरत्या छप्पराची व कौलारु घरे तर कुठे कुडाच्या भिंती आहेत. आत्ता अलिकडे पाणीपुरवठा योजने अंतर्गत काम चालू आहे. विहिरीवर मोटर बसवून घराघरामधून पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. अश्या प्रकारे प्रशासकीय नियोजन राबविण्यात येत आहे त्यामुळे पूर्वी इतकी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही कारण गावात श्रमदान व शासनांच्या योजनांमधून विहिरी गावात बांधण्यात आलेल्या आहेत त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय झालेली आहे. शेतीच्या बाबतीत पाण्याचा तसा प्रश्नच आहे.

**बारा वाडया वस्त्यांची नावे** :-
१. जांभोरी, २. हरणमळ, ३. केंगलेवाडी, ४. लोहारवाडी, ५. लिंबोणीची वाडी, ६. काळावाडी न.१, ७. काळेवाडी नं.२, ८.माचीचीवाडी, ९. नांदुरकीची वाडी, १०. बांबळेवाडी, ११. बापेवाडी १२. गावठाण


**ग्रामसभा** :- गावात दवंडी देऊन अजेन्डा वाटून मग ग्रामसभा घेतली जाते
ग्रामसभा तीन महिन्याने एकदा असते, मासिक बैठक दर महिन्याला असते, यात तातडीचे विषय उदा पाणी, लाईट, रस्ते, आरोग्य, शिक्षण व ग्रामस्थांचे वैयक्तिक प्रश्न वगैरे सदस्यांकडे येतात व मग सभा घेऊन त्या बाबत विचार विनिमय होतो.
**सरपंच**- मारुती धोंडू केंगले, **उपसरपंच**- किसन हरिबा पारधी, माजी सरपंच- **ग्रामसेवक** - विजय जयवंत येवले, **उपसभापती** - सलीम इस्माईल तांबोळी
१५ ऑगस्ट, १ मे, २६ जानेवारी, २ ऑक्टोबर अश्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी ग्रामसभा घेतल्या जातात. महिला सभा मागील वर्षापासून दोन झाल्या आहेत.


भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
जांभोरी गाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक २३/०४/२०१०





भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
जांभोरी गाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक २३/०४/२०१०





**जांभोरी गावातील विविध समित्या**
महात्मागांधी तंटामुक्ती समिती, ग्रामीण पाणीपुरवठा समिती, वन समिती, ग्रामविकास समिती, दारुबंदी समिती, शिक्षण समिती, स्वच्छता समिती, आरोग्य समिती,

**पाणी पुरवठा समिती :-** पोखरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अंतर्गत पाणी पुरवठा केला जातो. या समितीत एकूण ७ सदस्य आहेत यात ३ महिला व ४ पुरुष आहेत या सदस्यांचा पाच वर्षाचा कार्यकाळ असतो ग्राम सभेमध्ये विषय घेऊन सभासद निवडले जातात. रोज सकाळी साधारण एक तास पाणी येते ५५ हजार लिटरची टाकी आहे **तरी कोळवडी १ व २, हरणमळा व केंगलेवाडी या चार वस्त्या पाणी पुरवठया पासून वंचित आहेत.** दुसरी टाकी ४०००० लिटरची आहे यापासुन बांबळेवाडी, बापलेवाडी,तसेच चिखलीच्या वस्त्या -इस्टेवाडी, पासोडीवाडी यांना पाणी पुरवठा होतो. दररोज पाणी किती आले याप्रमाणे रेकॉर्ड त्याप्रमाणे बिल ग्रामपंचायतीला भरले जाते. असे रेकॉर्ड ठेवण्याचे काम दिनांक २/११/२००८ पासून केले जात आहे. त्याप्रमाणे महिन्याला किती पाणी आले याचा दाखला दिला जातो व त्यानुसार पाणीपट्टी वसुल करण्यास सोपे जाते. दिवसाला रु १/- व महिन्याचे रु ३०/- प्रमाणे पाणी पाट्टीची रक्कम ठरते. महिन्यातून दोन तीन वेळा पाण्यात टीसीएल टाकले जाते एकूण १७ नळकोंढाळी आहेत. सार्वजनिक विहिरी १० आहेत. आरोग्य खात्याकडून पाणी गुणवत्ता वेळो वेळी तपासली जाते. **(पावसाळयात दुषित पाण्यामुळे कावीळ, हागवण, हिवताप, मलेरिया, गॅस्ट्रो वगैरे जलजन्य रोग होतात कारण पावसाळयात उघडयावरील घाण उदा प्राण्यांचे मलमुत्र, मानवी विष्ठा, सांडपाणी हे सर्व वाहून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात मिसळते व पाणी दुषित होते सदर बाब घातक असून या गोष्टींचे व्यवस्थापन शासनाकडून होणे अत्यंत गरजेचे आहे. )**

**देखभाल दुरुस्ती :-** प्रादेशिक पाणीपुरवठा व ग्रामपंचायती मार्फत देखभाल दुरुस्तीची कामे केली जातात. ग्रामपंचायत साहित्य आणून देते. प्रादेशिक पाणीपुरवठयाचे लोक फक्त मदतीसाठी येतात. **(व्यंकोजी पाणीपुरवठा मंडळ पाईपलाईन करुन विहीरी खोदुन शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्रकल्पाकडून १०टक्के अनुदान मिळाले आहे. शेतीला भरपूर पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टिने या मंडळाच्या कामाला सर्वांचाच हातभार लागणे आवश्यक आहे )**

**वनसमिती :-** एकूण सदस्य ११ आहेत पैकी ४ महिला आहेत. फॉरेस्ट कायदा अंमलबजावणीची कामे या समितीमार्फत करतात. वृक्षतोड बंदी, प्राणी शिकार करणे बंदी, चराई बंदी वगैरे.,

**आरोग्य समिती :-** ७ सभासद आहेत. श्रीमती माया पाठक या अेएनएम आरोग्य सेविका आहेत त्या समितीच्या सचिव आहेत. ग्रामपंचायत सदस्य सरपंच आहेत. गावातील महिलांना प्रसुतीचे प्रशिक्षण दिले आहे. कोल्हापूर विद्यापिठातून डॉ जाधव हे स्तनदामाता, गरोदरमाता यांची तपासणी करण्यासाठी महिन्याच्या १० तारखेला येतात. आरोग्य उपकेंद्र गावात आहे.


एमपीडब्ल्यू व आरोग्य सेविका येथे काम पाहतात. पावसाळयात दुषित पाण्यामुळे जलजन्य आजार होतात त्यावर उपाय म्हणून वेळोवेळी शिबरे घेऊन लोकांच्यात स्वच्छते विषयक व आरोग्य विषय जनजागृती केली जाते.


**ग्रामविकास समिती :-** ११ पुरुष सदस्य आहेत महिला सदस्य नाही. कुठल्या सेवाभावी संस्थेला गावात जनजागृती किंवा प्रशिक्षण संदर्भात शिबीर घ्यावयाचे असेल तर या समितीमध्ये आधी बैठक घेतली जाते. जमिन सपाटीकरण, मुलांना सायकल वाटप, नळ दुरुस्ती वगैरे कामासाठी लाभार्थी निवडून सहभाग घेऊन मिळालेला पैसा गावाच्या विकास कामासाठी वापरला जातो. या वर्गणीतून इयत्ता १ ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी बेंच घेण्यासाठी १० टक्के रक्कम देण्यात आली आहे.

**शिक्षण समिती :-** इयत्ता १ ते १० वी पर्यन्त शाळा आहे. ८ आंगणवाडया आहेत. जिल्हा परिषदेच्या २ वस्तीशाळा व २ भागशाळा आहेत. इयत्ता ८ वी ते १० वी रयत शिक्षण संस्थेचे हायस्कूल आहे. **(उच्च शिक्षणासाठी मंचर, घोडेगाव, शहरात जावे लागते. उच्च शिक्षणासाठी गावातच सोय व्हावी अशी अपेक्षा)**
**शेती समिती :-** नाचणी, वरई, भात, सावा, काळातीळ, तूर, भुईमुग, हरभरा ही मुख्य पिके आहेत. बारीक जांभूळ, गावठी आंबा, फणस, तोरण ही फळे येतात. यांचा वापर उत्पन्नासाठी केला जात नाही, वैयक्तिक वापर केला जातो. करवंदे ही फळे बाजारात कवडीमोलांनी विकली जातात. **(सदर फळांचे उत्पादन जास्त होऊन उत्पादन मिळावे यासाठी सुधारीत जातीची फळझाडे लावुन उत्पादन वाढवले पाहिजे.)**
**जांभोरी आदिवासी विकास सहकारी संस्था मर्यादित** गावातील हिरडा हे पिक गोळा करते व त्याला बाजारपेठ मिळवून देते. सरपंच या समितीचे अध्यक्ष आहेत

**जांभोरीगावातील विविध योजना**
**(राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना** दोन वर्ष झाली गावात आली आहे परंतु अंमलबजावणी झालेली नाही. ३९७ पुस्तके रजिस्टर छापून तयार आहेत, ३०८ लाभार्थ्यांना त्याचे वाटपही झाले आहे. लोकांना रोजगार नाही हे पाहता या योजनेची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हांवी ही अपेक्षा आहे. शेतक-यांच्या शेतीच्या अडचणी सोडवून शेतातच रोजगार निर्माण करुन दयावा)
**ठक्करबप्पा योजना** या गावात नाही. शासकीय योजनेतून होणारी कामे व्यवस्थित होत नाहीत. बाहेरील ठेकेदार असतात ते छाटछुट कामे करतात, ती कामे टिकत नाहीत, पैसा फुकट वाया जातो. **(सदर कामे जातीने लक्ष देऊन पक्की कामे व्हावीत.)**
**इंदिरा आवास योजना :-** या योजनेअंतर्गत ५८ ते ६० घरकुले मिळाली आहेत. दारिद्रये रेषेखालील लोकांनाच सदर योजनेचा फायदा मिळतो. दारिद्रये रेषेखालील लोक कोण हे ठरविण्याचे जे निकष आहेत त्याचा फायदा घेऊन एकाच कुटुंबाला याचा फायदा मिळत राहतो व इतर अशी काही लोक आहेत की जी गरीब आहेत परंतु काही निकषात बसत नाहीत म्हणून या योजनेपासुन वंचित आहेत. **(लाभार्थ्यांची निवड करताना हे लोक लाभापासुन वंचित राहू**

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
जांभोरी गाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक २३/०४/२०१०





नयेत अशी काही तरी तरतुद करणे आवश्यक आहे. )
**यशवंत ग्राम समृध्दी योजना :-** या योजनेंतर्गत गावात शाळाबांधणीचे काम चालू आहे. ते लवकर पूर्ण व्हावे. **(पुढे आता गावात सांडपाणी व्यवस्थापन होण्यासाठी गटर बांधणी पाहिजे. समाजमंदिर पाहिजे.)**
**हागणदारीमुक्त गाव योजना :-** या योजनेंतर्गत २०१२ पर्यन्त सर्व गाव हागणदारीमुक्त होण्याच्या दृष्टिने वैयक्तिक शौचालय बांधणीसाठी शाळेतील शिक्षकांना काही कुटुंबाना प्रोत्साहीत करण्याचे काम दिले आहे. **(लोकसहभाग वाढण्यासाठी शासनामार्फत ग्रामसेवक, सरपंच, गवंडी, युवामंडळे, महिला बचतगट यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.)**
शौचालय लाभार्थी - प्रथम अर्ज करुन ग्रामसभेत ठराव घेतला जातो. पत्र व प्रस्ताव पंचायत समितीला जातो. जिल्हा परिषद किंवा समाजकल्याण निवड करत असते. मंजुरी मिळते अनुदान दोन हप्त्यांमध्ये मिळते. बांधकामाच्या आधी पन्नास टक्के व नंतर मुल्यांकन दाखला मिळवण्याकरिता ग्रामपंचायतीमार्फत फोटो काढला जातो. पंचायत समिती इंजिनिअर देखरेख करतात व नंतर मुल्यांकन दाखला मिळतो व नंतर दुसरा ५० टक्के हप्ता मिळतो.


**गावातील महिला सदस्यांनी** पाण्याची टाकी मागून घेतली, विहीरी दुरुस्त केल्या, तळयाचे बांधकाम केले, सभामंडप बांधला, रस्ता दुरुस्तीची कामे केली, लाईटची कामे केली.
**समस्या - उपाय** - यशवंत ग्रामसमृध्दी योजना अंतर्गत सांडपाण्याचे व्यवस्थापन होण्याच्या दृष्टिने गटार योजना व्हावी. तसेचे पाणी पुरवठा सुरळीत व्हावा.


**श्री आंकुश बाबन गिरंगे** - गाव - नांदुरीची वाडी वय ३६ - लेखनिक - दोन वर्षापासून जांभोरी गावात आहे या आधी वनवासी संस्था, नारी समता मंच, अश्या ठिकाणी काम केले आहे. शिक्षण इ. १० वी. घरच्या परिस्थितीमुळे पुढचे शिक्षण झाले नाही. आत्ता पुढे शिकण्याची सुध्दा इच्छा नाही. दोन एकर शेती आहे. विवाहीत - पत्नी १० पर्यन्त शिकलेली आहे. ४ वर्षाचा मुलगा, २ वर्षाची मुलगी आहे. आई आहे, वडिल नाहीत. शेतात फक्त भात पिकतो.
सबब - सदर व्यक्तीने जांभोरी गावात प्रत्येक रेकॉर्ड अगदी व्यवस्थीत ठेवले आहे. इतरांनी अनुकरण करण्यासारखी बाब आहे.
प्रत्यक वेळ प्रसंगाचा तारखेनुसार फोटो काढून त्याचे फोटो पुस्तक तयार केले आहे. त्यामुळे प्रत्येक प्रसंगाची नोंद राहते.


प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेले गट खालील प्रमाणे


- वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी
- पर्यटन मार्गदर्शक
- सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी
- स्वयंसहाय्यता गटाचे सभासद
- गावातील युवागट/मंडळे औषधी वनस्पतींचा विविध वापर

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
कोंढवळ, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक १९/०५/२०१०









## भौगोलिक व आर्थिक स्थिती:-

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व पर्यावरण विकास केंद्र यशदा यांच्या सहयोगाने भिमाशंकर क्षेत्रातील, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी गावांसाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण या विषयांर्गत कोंढवळ गावाला दिनांक १९ मे २०१० रोजी भेट देण्यात आली.

घनदाट जंगलातून नागमोडी वळण घेत गाडी पुढे जात होती सुमारे ४ किमी अंतर रस्ता पार केल्यानंतर दूरवर उंच उंच डोंगराच्या कुशित वसलेले हे छोटेसे व दुमदार गाव आहे. लोकसंख्या साधारण ५००/६०० तर कुटुंबसंख्या १४० च्या आसपास आहे. छोटेछोटे चार खांबांचे मांडव ठिकठिकाणी घातलेले आहेत त्यावर वाळलेले गवत व खाली जनावरे बांधलेली होती पावसाळा जवळ आल्यामुळे पेरणी करण्यासाठी शेती मशागत करुन तयार ठेवलेल्या दिसत होत्या. गवांदेवाडी, शिंदेवाडी, ढगेवाडी अश्या तीन वाडया व एक गावठान कोंढवळ गाव आहे. वाडया वस्त्या पण दूरदूर पसरलेल्या आहेत, जाण्यायेण्याची सोय नाही त्यामुळे पायीच जावे लागते.

तसेच वाटेत जाताना पाण्याचे हापसे व त्यावर पाणी भरण्यासाठी भांडी घेऊन बसलेल्या मुली, बायका, पुरुष थांबलेले होते. हापश्याला पाणी थांबून थांबूनच येत होते. कारण जमिनीतील पाण्याचा साठी कमी झाला होता, एक भांडे भरले की पुन्हा जमिनीत पाणी साठले की, मगच हापश्यातून बाहेर येत होते. लोक लांब जांब जाऊन पाणी आणताना दिसत होते. या सर्व गोष्टींवरुन असे समजले की गावात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. आणखी पुढे गेलो तर लहान मुले, तरुण मुले, मोठी माणसे असे बरेच जण क्रिकेट खेळत असताना दिसले. विचारपूस केली त्यावर उत्तर मिळाले की काहीच काम करण्याचे साधन नाही म्हणून वेळ घालवतोय. गावात रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. गावात आत येण्यास घनदाट ४ किमी ची वाट त्यामुळे गावात एसटी सेवा १५ वर्षापासून बंद आहे त्यामुळे एसटी मिळवण्यासाठी जंगलातून ४ किमी अंतर पार करुन जावे लागते. वाहतुकीची व्यवस्था नाही दुकानेसुध्दा नाहीत. घोडेगावातून बाजार आणून येथे विक्री करणे अजिबात परवडत नाही. पावसाळ्यात तर सतत पाऊस कोरडे पडलेल्या ओढयांना भरपूर पाणी असते. जाण्यायेण्याचा रस्ता बंद होऊन जातो. अश्या प्रकारे अतिशय मागासलेला हा गाव आहे.

कोंढवळ गावातील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार या गावात कधी ग्रामसभा होत नाहीत निगडाळे येथे ग्रुप ग्रामपंचायत असल्यामुळे आजपर्यन्त गावत ग्रामपंचायतीचे ऑफिस सुध्दा बांधलेले नाही, ग्रामसेवक कोण हे सुध्दा गावातील लोकांना माहित नाही. ग्रामपंचायत सदस्य १०-११ आहेत तेच गावाचा कारभार पाहतात आम्हाला काहीच माहिती नाही. रस्ता, स्वच्छता, सांडपाणी, बस, वीजसेवा अतिशय कमी आहेत. योजना खोटया खोटयाच राबविल्या जातात. गावकऱ्यांना त्याचा लाभ होत नाही रोजगाराच्या संधी नाहीत. गावातील तरुण बेकार फिरतायेत व्यसनाधीन होतात. ही समाज घातक बाब शासनाने तातडीने लक्षात घेण्यासारखी

आहे. घरपट्टी पाणीपट्टी वसूल केली जाते. पण कुठल्याच योजना राबवल्या जात नाहीत. ग्रामस्थांना कोणताही लाभ मिळत नाही.

शालेय सुविधा - इयत्ता १ ली ते ४ थी पर्यन्त जिल्हा परिषदेची शाळा गावात आहे. पुढील शिक्षणासाठी ४ किमी जंगली रस्ता ओलांडून तेरुंगणगावामध्ये जावे लागत. प्रवासाची कोणतीही सोय नाही त्यामुळे इच्छा असून सुध्दा प्रवासाचा धोका लक्षात घेता शक्यतो पुढील शिक्षण घेतलेच जात नाही. त्यातल्या त्यात मुली पुढील शिक्षण घेतच नाहीत. आधुनिक युगात ही बाब गंभीर आहे. उपाययोजना म्हणून गावात पुढील शिक्षणाची सोय व्हावी, औद्योगिक प्रशिक्षण मिळावे रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात, तरुणांना गावातल्या गावात कामधंदा मिळावा.

आरोग्य सुविधा - १५ किमी अंतरावर तळेघर गावात आरोग्य सुविधा केंद्र आहे. वाहतुकीची व्यवस्था नसल्यामुळे अचानक आजारी पडलेल्या माणसाला आरोग्य सेवा मिळणे अति कठिण आहे, गावात आरोग्य केंद्र सुध्दा नाही. जनावरे औषधपाण्यावाचून मरतात व माणसेही मरतात अतिशय गंभीर परिस्थिती आहे. शासनाने कृपाकरुन याकडे जातीने लक्ष दयावे.

शेती - जंगलातून हिरडा गोळा करणे व तो वाळवून विकणे हा मुख्या व्यवसाय आहेच. परंतु शेती हा सुध्दा मुख्य व्यवसाय आहे, भात, नाचणी, वरई, सावा, पालेभाज्या पावसाळयातील तीळ, वाटाणा, भुईमुग वगैरे पिके घेतली जातात. परंतु जंगली जनावरांचा भयंकर त्रास आहे. शेतातील पिके उध्वस्त करतात. अति पाऊस पडला तरी पिके वाहून जातात. ओला दुष्काळ पडतो, तर कधी पाऊसच वेळेवर पडत नाही. पेरण्या जळून जातात. अश्या प्रकारे नैसर्गिक आपत्तीना सुध्दा वारंवार तोंड दयावे लागते. आठवडयाचा बाजार तळेघर येथे आहे. १४-१५ किमी जाऊन बाजार आणणे कठीण होते. प्रत्येक बाबतीत गैरसोय आहे. रेशनिंगचे दुकान निगडाळे या गावात आहे ते चार किमी अंतरावर आहे. माल कधी येतो, कधी संपतो हे समजत पण नाही.

आमच्यासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत असावी. पाणी पुरवठयाची योजना राबवावी. विविध योजना आमच्यासाठी राबवल्या जाव्यात. आमच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी. आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात. वाहतुक व्यवस्था सुरु व्हावी. रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. शासकीय कामाची ग्रामस्थानां माहिती व्हावी.

**प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेले गट खालील प्रमाणे**
वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी
पर्यटन मार्गदर्शक सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी,
स्वयंसहाय्यता गटाचे सभासद गावातील युवागट/मंडळे औषधी वनस्पतींचा विविध वापर


**भौगोलिक व आर्थिक स्थिती:-**
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे व पर्यावरण विकास केंद्र यशदा यांच्या सहयोगाने भिमाशंकर क्षेत्रातील, आंबेगाव तालुक्यातील आदिवासी गावांसाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण या विषयांर्गत राजपूर गावाला दिनांक १९ मे २०१० रोजी भेट देण्यात आली


छोटेसे व टुमदार गाव आहे. राजपूर गावातील ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार या गावात फार पुर्वी हेमाडपंथी मोठा राजवाडा होता व त्यामुळेच या गावाला राजपूर असे नाव पडले आहे. इंग्रजांची सत्ता येण्याआधीच दुष्मनांकडून हा राजवाडा उध्वस्त करण्यात आला होता अजूनही येथील शेतांमध्ये राजवाडयाचे अवशेष म्हणजे मोठया-मोठया नक्षीदार शिळा सापडतात. या गावातील लोकांनी हे दगड घराच्या कंपाऊंड साठी वापरले आहेत. देवतांच्या दगडाच्या मूर्ती सापडतात. त्याच काळात तयार करण्यात आलेले एक मोठे पाण्याचे तळे आहे या तळयाला १२ महिने पाणी असते. हे पाणी शेजारच्या वाडया वस्त्यांना सुध्दा पुरवले जाते. परंतु उन्हाळयात या तळयाचे पाणी कमी होते. अश्याप्रकारे या **गावाला ऐतिहासीक महत्व आहे. शासनाने जातीने लक्ष दिले तर पर्यटन स्थळ म्हणून नावारुपाला येण्याजोगे हे गाव आहे.** उंच उंच डोंगर, हिरव्यागार औषधी वनश्रीने नटलेले व निसर्ग सौदर्य लाभलेले हे गाव आहे. पावसाळयात संतत धार पाऊस असूनसुध्दा उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासते, शेतीला पुरेसे पाणी नाही. कारण पाणी आडवा पाणी जिरवा या संदर्भात शासनाचे अनुदान मंजुर होऊन सुध्दा कित्येक वर्ष रखडलेले प्रकल्प येथे आहेत. झपाटयाने विकासाची कामे करणारा कोणी वालीच या गावांना भेटत नाही. काही ठिकाणी राजकारण तर काही ठिकाणी सामाजिकवादाच्या विळख्यात आडकलेली व म्हणूनच विकासापासून वंचित राहिलेला हा गाव आहे. गावात १२ तळी आहेत. पाणी पिण्यासाठी वापरले जाते. शेतीसाठी धरणाचे पाणी उचलणे आवश्यक आहे.

**श्री काळुराम बाळू लोहकरे -** विशेष कार्यकारी अधिकारी - तंटामुक्ती अध्यक्ष - पंचायत समिती सदस्य
**२००६-२००७ मध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव म्हणून दोन लाख रुपयांचे गावाला बक्षिस मिळाले आहे.**

**प्रशासकिय बाबींमध्ये ग्रामस्थांचासुध्दा सहभाग असावा,** ख-या अर्थाने लाभार्थींची निवड व्हावी यात भ्रष्टाचार नसावा. ग्रामसभा शासकिय नियमानुसार व्हाव्यात व त्याबाबत सरपंच व ग्रामसेवक यांच्यात समन्वय असावा. ग्रामपंचायतीने आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता यांच्याकडे जातीने लक्ष देऊन त्याबाबत कार्यक्रम हाती घ्यावेत. **त्यादृष्टिने ग्रामपंचायतीचे सदस्य होतकरु असावेत. त्यांना त्यांच्या कामकाजा संदर्भात कायदया संदर्भात प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.**

**दारु ही समाजाला लागलेली किड आहे.** दारुबंदी मोहीम हाती घेतली परंतु काही फायदा होत नाही. पोलिसांना जाऊन तक्रार केली तरी पोलीस नुसती आश्वासने देतात, कार्यवाही काहीही





होत नाही. गावपातळीवर काही लोकांनी प्रयत्न केला पण गावातच असे काही टगे विरोधक आहेत ते दारुबंदीच्या विरोधात अडचणी निर्माण करतात.

**साक्षरता मोहिम** गावात राबवली. साक्षरता वर्ग चालू होते, परंतु यशस्वी झाले नाहीत. मोहिम यशस्वी झाली असा आभास निर्माण करण्यासाठी गावातील शिकलेल्या मुलींना साडया नेसवून साक्षरता मोहिम यशस्वी झाल्याचे भासवले हे योग्य नाही. अश्या प्रकारच्या **भ्रष्टाचाराला आळा बसवण्यासाठी तातडीची उपाययोजना पाहिजे.**

गावात ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यांची माहिती ग्रामस्थाना मिळणे आवश्यक आहे. **रोजगार निर्मितीच्या दृष्टिने विविध प्रशिक्षण आयोजित करावे म्हणजे गावातील तरुण वर्ग शहराकडे स्थलांतरीत होणार नाही.**
**विविध योजनांचे व्यवस्थित नियोजन करुन उपलब्ध निधीनुसार कामांची वर्गवारी करावी.**

**वनसमिती कामकाज-**

- शासकीय अधिकारी लक्ष घालत नाहीत. वनसमिती काहीच काम करीत नाहीं झाडे लावली परंतु ती जगली की नाही याकडे लक्ष नाही. याची नोंद घेणे आवश्यक आहे.
- गावक-यांनी लावलेल्या झाडांची सातबारावर नोंद घेण्यात यावी.
- कोटयावधीचे लाकूड चोरवाटेने जंगलातून बाहेर जाते. पैसे खावून जंगल तोड होते रक्षकच भक्षक आहेत.
- काही जंगले मालकी हक्काची आहेत त्यातूनच वनरक्षक चो-या करतात. प्रोसिडिंग वनखात्याचे लोक स्वतःच्या हिताचेच लिहितात.


**पंचायत समिती कामकाज-**


सरपंचाची निवड निवडणूकीने होते. एकूण सदस्य संख्या ७ आहे. सरपंच व ग्रामपंचायत सदस्य किमान १० वी पास पाहिजेत अशी कायम स्वरुपी अट असावी. तसेच त्यांना सामाजिक कामाची आवड असावी. त्यांची निवड ग्राम विकासासाठी किमान वेळ देण्याची तयारी असेल तरच करावी.ग्राम विकासा साठी योजना गावात आणण्याची व त्याचे योग्य नियोजन करण्याची क्षमता त्यात असावी.

नजिकच्या काळाता गटविकास अधिकारी यांच्या मार्फत आदिवासी भागात ठराविक गावांचा ग्रुप जमा करुन विभागीय ग्रामसभा घ्यावी व त्यातूनच नागरिकांना मार्गदर्शन घडवावे.

पंचायत समिती सदस्य व सरपंच यांना प्रशिक्षण देण्यात यावे. येणारा निधी ज्या-त्या खात्यावर जमा होत नाही. कोणत्याही सदस्याला शासनाच्या कामाची नीट माहिती नाही.

भिमाशंकर क्षेत्रातील शाश्वत विकासाकरीता आदिवासी गावापातळीवरील प्रशासकीय पध्दती
प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण प्रकल्प
राजपूर, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, दिनांक १९/०५/२०१०





ग्रामपंचायत क्षेत्रात होणारी विकास कामांची देखरेख करणे कामे करुन घेणे ही जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. त्यादृष्टिने ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य जागरुक असावेत.

**नळपाणीपुरवठा** - नळपाणी पुरवठयाचे लाईटबील १२-१५ लाख थकले आहे व ग्रामपंचायत हे बील भरण्यास सक्षम नाही.

राजकारणी लोक गावक-यांनी मांडलेला प्रस्ताव जुमानत नाही. स्वतःच्या स्वार्थासाठी मनाला वाटेल तश्या योजना राबवतात. ठेकेदार व अधिकारी हे इस्टिमेट एकपट असल्याचे दाखवतात. तीन पट हस्तक्षेप कुणीही घेतला तर योजना बारगळते.
योजनेमधील पात्र लाभार्थींचे चावडी वाचन झाले पाहिजे.

**ग्रामसभा** - १ मे २०१० ला महिला ग्रामसभा होणे आवश्यक आहे पण महिला ग्रामसभा होतच नाही.

ग्रामसभेला प्रत्येक १८ वर्षावरील सदस्याने हजर राहून ग्रामविकासाबाबत चर्चा करावी. ग्रामसभेला सर्व सदस्यांना प्रथम हजर राहणे जरुरीचे असते. सदस्यच जर हजर राहिले नाहीत तर ग्रामस्थ किती सहभागी असू शकतील कित्येक वेळेला ग्रामसभेत ग्रामसेवक हजर नसतात. कारण त्यांच्याकडे जन चार ग्रामपंचायती असतात.

२६ जानेवारी, १५ ऑगस्ट,१ मे, २ ऑक्टोबर, इतर शिवजयंती अश्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी ग्राम सभा घेतली जाते.

ग्रामसभे अंतर्गत शेळया वाटप, बैलजोडी वाटप अश्या प्रकारचे लाभ लाभार्थींना मिळाले आहेत.
**(ज्या वैयक्तिक स्वरुपाच्या योजना राबविल्या जातात त्याच्यावर नियोजनबध्द शासकीय कमिटी असावी व त्या कमिटीमार्फत व्हेरिफिकेशन करण्याची सक्ती असावी. )**

**शैक्षणिक सुविधाः-** आंगणवाडी, प्राथमिक शाळा आहे. तेरुंगण गावात इ. १० पर्यन्त आश्रमशाळा आहे, वसतीगृहाची सोय आहे.

**प्रशिक्षण देण्यासाठी निवडलेले गट खालील प्रमाणे**
वनविभागाचे कर्मचारी व अधिकारी
पर्यटन मार्गदर्शक सेवाभावी व शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी,
स्वयंसहाय्यता गटाचे सभासद
गावातील युवागट/मंडळे यांना औषधी वनस्पतींचा विविध वापर.